पुढारी

# १०० व्या नाट्यसंमेलनात मागण्यांची जंत्री, आश्वासनांचा सुकाळ



नाट्यसंमेलनाच्या उद्घाटनाला आणि समारोपाला राज्यातील सत्ताधारी पक्षातील मुख्य नेते होते. या संमेलनाकडे नाट्य परिषदेने विविध मागण्या यावेळी केल्या. मनसे अध्यक्ष राज ठाकरे आपल्या भाषणात म्हणाले, आतापर्यंत सर्वच पक्षांच्या नेत्यांनी रस्ते, पाणी या मुलभूत गरजांच्या बळावर निवडणूका लढवल्या. नाट्य परिषदही संमेलनाच्या व्यासपीठावर वर्षानुवर्षे नाट्यगृह, नवोदित आणि ज्येष्ठ कलाकारांच्या त्याच-त्याच प्रश्नांची झोळी घेवून मंत्रालयाचे उंबरठे झिजवत आहे. या संमेलनात मागण्यांची जंत्री आणि आश्वासनांचा सुकाळ यावेळी होता.

**नेमेचि येतो पावसाळा...तसे दरवर्षी साहित्य आणि नाट्य संमेलनाचे सूप वाजते... तसेच यंदाच्या नाट्य संमेलनाच्या बाबतीत म्हणता येणार नाही... कारण यंदाचे नाट्य संमेलन महाराष्ट्राच्या रंगभूमीची १०० वर्षांची परंपरा सांगणारे संमेलन होते... त्यामुळे ते महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहचण्यासाठी आणि मराठी नाटकाचा पाया रोवला गेला, तिथे म्हणजे तंजावर आणि सांगलीत संमेलनाची मुहूर्तमेढ करण्यात आली. विभागीय संमेलनाची सुरुवात पुण्यातून तर प्रत्यक्षात १०० व्या संमेलनाचा शुभारंभ पिंपरी - चिंचवडमधून अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेने केला. आता विभागीय संमेलन सोलापूर, नगर, नागपूर, मुंबईत होईल आणि या संमेलनाची सांगता रत्नागिरीत होईल.**



१०० वे नाट्यसंमेलन

अनुपमा गुंडे

नाट्य आणि साहित्य संमेलन हा आता एक इव्हेंट झाला आहे. तसाच भव्यपणा चिंचवडच्या नाट्य संमेलनाच्या आयोजनात होता, ते आता रसिकांनाही नवे नाही आणि अशी भव्य- दिव्यता असेल तर रसिकही येतात... त्यामुळे हे सगळे एकमेकांना साजेसे होते. यजमान आणि आयोजकांनी कितीही जीवाचे रान केले, तरी त्यात त्रुटी राहतात. तसेच या संमेलनात झाले. एरवी रंगमंच कामगारांसाठी वारेमाप घोषणा करणारे, सतत त्यांच्याविषयी आस्था दाखवणाऱ्यांनी संमेलनाला आलेल्या रंगमंच कामगारांना दोन दिवस राहण्यासाठी बरी म्हणावी, अशी निवास व्यवस्थाही आयोजकांनी दिली नाही आणि इतर कलाकार, अन्य पाहुण्यांना आयोजकांनी रेड कार्पेट टाकले होते, हा भेदभाव या संमेलनात प्रकर्षाने जाणवला. पडद्यामागे असले तरी रंगमंच कामगार हा रंगभूमीचा कणा आहेत, संमेलनात त्यांच्याकडे झालेले दुर्लक्ष हे चुकीचे होते.

संमेलनात कलाकारांची उपस्थिती हा दरवर्षीचा चर्चेचा मुद्दा यंदाही गाजला. संमेलनाला गिने- चुने चेहरेच येतात. त्याचे सबळ कारण दिले जाते, ते अनेक कलाकार मालिका, चित्रपटाच्या चित्रीकरणात व्यस्त असतात, हे व्यस्त असणारे बहुतांशी कलाकार रंगभूमीच्या मांडवाखालून गेलेले असतात. ज्या रंगभूमीने आपल्या पदरात पैसा, प्रसिद्धीचे दान टाकले, त्या रंगभूमीच्या उत्सवाकडे कलाकार पाठ फिरवतात, यावर संमेलनाचे निमंत्रक आणि नाट्य परिषदेचे विश्वस्त उदय सामंत यांनीही कलाकारंच्या संमेलनातील उपस्थितीवर बोट ठेवले, हे संमेलन कलाकारांचे असते, त्यामुळे कलाकारांनी या संमेलनाला यावे, यासाठी संमेलनकाळात निर्मात्यांनी नाटकाचे प्रयोग ठेवू नये, असा नियम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

संमेलनात सहसा नाट्य सद्यस्थितीवर परिसंवाद, चर्चा जास्त होतात, त्यातून मंथनही घडते, पण या संमेलनात ऑनलाईन एन्टरटेनमेंट आणि चॅट जीपीटीचा रंगभूमीवर होणारा परिणामावर परिसंवाद झाला. रंगभूमी समोर असलेले तंत्रज्ञानाचे आव्हान, त्याचे गुलाम न होता त्याचा रंगभूमीसाठी कसा फायदा होईल, असा सकारात्मक सूर परिसंवादात उमटला. रंगभूमीसमोरील तंत्रज्ञानाच्या आव्हानाचे सूर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणवीस यांच्याही भाषणात उमटले. मूकपट, बोलपट, टीव्ही आला तेव्हाही रंगभूमीपुढे हीच भीती होती, आताही तंत्रज्ञानाची आव्हाने असली तरी जोपर्यंत मराठी रसिक आहेत, तोपर्यंत मराठी रंगभूमीला मरण नाही, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. नाट्य आणि साहित्य संमेलने ही गेल्या काही वर्षात त्यावर होणाऱ्या मंथनांपेक्षा त्यात होणाऱ्या मागण्यांनी जास्त गाजतात, कारण या संमेलनाची व्यासपीठे राजकीय नेत्यांच्या भाऊगर्दीनं भरलेली असतात, त्यातील घोषणांच्या शिडकावेही तळापर्यंत किती झिरपतात, हा संशोधनाचा मुद्दा आहे, कारण १०० संमेलनातही नाट्यगृहांच्या सुस्थिस्थीतीची मागणी करावी लागते, हे वास्तव त्यासाठी पुरेसं आहे. या संमेलनातही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रंगकर्मींच्या मागण्या पूर्ण करण्याची भरघोष आश्वासनं दिली आहेत, त्या आश्वासनांचा पाठपुरावा नाट्य परिषदेलाच करायचा आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालय वर्गवारी आणि नियमानुसार कलाकरांना जे मानधन देते, महागाईच्या जमान्यात त्या तुटपुंज्या मानधनात वाढ करण्याचे आश्वासन सर्वच सत्ताधार्यांनी रसिकांच्या साक्षीने दिले. नाट्य संमेलनाध्यक्ष जब्बार पटेल यांनी विद्यापीठ पातळीवर होणाऱ्या नाटकांना सेन्सॉरशीप नको, त्यांना नाटकातून व्यक्त होण्याची मुभा मागितली आणि विद्यापीठातील कला विभागांच्या अनुदानात वाढ करण्याची मागणी त्यांनी केली.

नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांनी नाट्यगृहे बांधतांना आणि बांधल्यानंतही ती सुस्थितीत रहावी, यासाठी रंगकर्मींना त्या प्रक्रियेत सहभागी करण्याची रास्त मागणी केली. राज्यात ७५ नाट्यगृहे उभारण्याची घोषणा राज्याचे सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगुंटीवार यांनी यापूर्वीच केली आहे, ती नाट्यगृहे उभारली जाईपर्यंत आम्ही पद सोडणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. अस्तित्वात असलेली नाट्यगृहे आधुनिक सोयींनी युक्त आणि पर्यावरणपूरक करण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला. मंत्रालयात फाईली कोणत्या वेगाने आणि कशा फिरतात, हे दस्तुरखुद्द मंत्रीमहोदयांनी जाहीरपणे मान्य केले, सरकारी यंत्रणा कशी काम करते, मग ती स्थानिक स्वराज्य संस्थांची असो की मंत्रालयातील याचा अनुभव कलाकारांना नाट्यगृहाच्या यंत्रणेत वेळोवेळी येतच असतो, त्यामुळे रंगभूमीच्या आणि कलाकारांच्या उर्जितावस्थेसाठी मागण्यांच्या फाईलींचा प्रवास वेगाने कसा घडवायचा, याकडे परिषदेला लक्ष द्यावे लागणार आहे, तेही लोकाश्रयाचे आपले वजन वापरून.

साहित्य असो की, नाट्य संमेलनाच्या व्यासपीठावर राजकारण्यांची उपस्थिती या विषयाचा आता चोथा झाला होता. आम्ही राजकारणी ३६५ दिवस नाटक करत असतो, त्याचा ट्रेलर जनतेने बघितलता, अशी सत्तांतराचे दाखले देत रसिकांचे हसे राजकारण्यांनी मिळवले, पण कलाकारांना पुन्हा मागण्यांची झोळी घेवून राजाश्रयासाठी त्यांच्याच दारात जावे लागत असल्याने व्यासपीठावरची त्यांची स्थाने अढळ आहेत, त्यामुळे टीका होवो की, चर्चा राजकारणात नाटक आणि नाटकात राजकारण हे अटळ झाले आहे. या संमेलनात व्यावसायिक नाटके भरपूर झाली, पण ती अंतरा अंतरावर होती, त्यामुळे केवळ त्या- त्या भागातल्या रसिकांना त्याचा आस्वाद घेता आला. चिंचवड, सांगवी आणि निगडी हा भाग सेवा, उद्योगात राबणाऱ्या कष्टकरी, मध्यमवर्गीयांचा आहे, हा वर्ग नाटकाचे ५००, ३००, २०० रूपयांचे तिकिट काढून नाटकाला जावू शकत नाही, त्यांना नाटक पहायला मिळाले. नाट्य संमेलनाच्या दिंडीत मालिकांमुळे कलाकारांची ओळख अधिक असल्याचे रसिकांच्या प्रतिसादावरून जाणवत होते.

१००वे संमेलन म्हणून सरकारने या संमेलनाला ९ कोटी ८३ लाख रूपयांचा निधी दिला आहे. त्यात आणखी चार संमेलने व्हायची आहे. पिंपरी - चिंचवड आणि पुणेकरांनी स्थानिक प्रायोजकांची मदत घेवून संमेलनाचा घाट घातला. या निधीतील काही भाग स्थानिक कलाकारांसाठी आणि कलेसाठी भरीव करण्याची सूचना सामंत यांनी केली. नटसम्राट अप्पा बेलवलकरांची व्यथा घेवून आज अनेक कलाकार जगत आहेत, रसिकांचे मनोरंजन, प्रबोधन करणाऱ्या थकलेल्या बेलवलकरांना आज आधाराची गरज आहे, ही गरज ओळखून दिवंगत अभिनेते यांनी पुण्यात अशा कलाकारांसाठी वृध्दाश्रम उभारण्यासाठी जागा दिली. या जागेवर १०० व्या संमेलनाच्या सांगतेआधी वृद्धाश्रमाचे भूमिपूजन करण्याचे आश्वासन उद्योगमंत्री आणि संमेलनाचे निमंत्रक उदय सामंत यांनी दिले. संमेलनाच्या व्यासपीठावर नाटक करणारे राजकारणी आहेतच, पण नाटकाला, कलाकारांना लोकाश्रय मिळवून देण्यासाठी राजाश्रय लागतोच, राजाश्रयाचे हात पूर्वी पडद्यामागे असायचे, ते आता व्यासपीठावर असतात, पण त्यातील अभिव्यक्तीची आणि राजाश्रयाच्या सीमरेषेचे भान कलाकारांनी सांभाळण्याची गरज आहे.

Mumbai Edition
Jan 14, 2024 Page No. 6
newspaper.pudhari.co.in